शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २१६ । मंगळवार, दि. २७ मे २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## मंत्रालय आवारात साचले पाणी

**मुंबई ।** मुंबईत रात्रभर झालेल्या पावसाने अनेक सखल भागात पाणी साचले असून यातून राज्याच्या प्रशासनाचे मुख्यालय असलेले मंत्रालयही सुटले नाही. पावसाच्या पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने मंत्रालय परिसर सोमवारी जलमय झाला होता. या साचलेल्या पाण्यातून वाट काढत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना मंत्रालय गाठावे लागले. मंत्रालयाच्या गार्डन गेट, आरसा गेट येथे आज सकाळच्या वेळेत गुडघाभर पाणी साचले होते. त्यामुळे मंत्रालय गाठताना कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली.






## संपादकीय

### या टप्प्यावर चिंतनही गरजेचेच

इयत्ता अकरावी आणि अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांचे दिवस आहेत. ज्यांनी वेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशपरीक्षा दिल्या आहेत त्यांना निकालाची प्रतीक्षा आहे. ज्यांना दहावी आणि बारावीत त्यांच्या अपेक्षेप्रमाणे गुण मिळालेले नाहीत त्यांना पुढील अभ्यासक्रम प्रवेशाचा ताण आला असेल. विशेषत: ज्यांना कमी गुण मिळाले त्यांना आता नेमका कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा किंवा मिळेल याविषयी संभ्रमावस्था आहे. विद्यार्थी जगतात सध्या अशा संमिश्र भावना आढळतात. त्याचे उत्तर आगामी काळात त्यांना मिळणारच आहे. तथापि गुणांचे निश्चित केलेले ध्येय साध्य का झाले नाही यासाठी आत्मपरीक्षण ते करतील का? अर्थात, त्या चिंतनाचा उपयोग भविष्याची वाटचाल सुकर व्हावी यासाठीच व्हायला हवा. पण ते करतांनाही परीक्षा आणि त्यात मिळणारे गुण हा आयुष्यातील एक टप्पा आहे. त्यामुळे कोणत्याही परीक्षेत मनासारखे यश नाही मिळाले किंवा अपयश आले तरी मुलांनी खचून जाऊ नये. प्रत्येक मुलामध्ये काही ना काही क्षमता असते. आवड असते. मुले क्रियाशील व सर्जनशील असतात. गुण कमी मिळाले म्हणून ती कमी होऊ न देणे मुलांच्याच हातात असते. एक दरवाजा जेव्हा बंद होतो तेव्हा अन्य दरवाजे उघडतात असे म्हणतात. विद्यार्थी त्यांचे भविष्य घडवू शकतील, अशी नवनवी माध्यमे उपलब्ध होत आहेत. शोधाल तेवढे मार्ग आहेत. काही काळापूर्वी कोणी विचारदेखील केला नसता अशी रोजगाराची नवनवी क्षेत्रे उदयास आली आहेत. येत आहेत. शिवाय काळ विविध कौशल्यांचादेखील आहे. या क्षेत्रांची माहिती, त्यासाठीचे आवश्यक कौशल्य, किमान शैक्षणिक पात्रता मुले नक्कीच कमावू शकतात. संधी प्रत्येकाचे दार ठोठावते असे मानले जाते. ती संधी मिळवून तिचे सोने करण्याइतका चाणाक्षपणा मुलांनी दाखवणे अपेक्षित असते. मुले अडनिड्या वयाचीच असतात. त्यांना समजावून घेणे पालकांचे कर्तव्य आहे. स्वाभाविक आवड शोधण्यात आणि भविष्याचे क्षेत्र शोधण्यात पालक मुलांना मदत करु शकतील. मुलांनी संवाद साधावा आणि त्यांच्या मनीचे गुज सांगावे इतके खेळीमेळीचे आणि मोकळे वातावरण घरात पालक पान २ वर

# आभाळ फाटलं!

## मुंबईत १०७ वर्षातला रेकॉर्ड ब्रेक : राज्यभरात पावसाचे धुमशान











**मुंबई ।** मोसमी पाऊस वेळे आधीच आल्याने मुंबईतील सर्व सखल भागात पाणी शिरले आहे. या पावसाने मुंबईतील सखल भागासह मेट्रो तीन आणि रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने वाहतूक व्यवस्थेचे तीन तेरा वाजले. दरम्यान, आयएमडीने मे महिन्यात मुंबईत शतकातील सर्वाधिक पाऊस पडल्याचे म्हटले आहे. गेल्या १०७ वर्षातला मे महिन्यातला सर्वाधिक पाऊस मुंबई अनुभवत आहे.

मुंबईच्या इतिहासातील २६ मे रोजी पडलेला हा सर्वाधिक पाऊस आहे. शहरात मे महिन्यात इतका जास्त पाऊस शंभर वर्षांपूर्वी पडला होता. दक्षिण मुंबईत कुलाबा येथे १३५ मिमी पाऊस २४ तासांत पडला आहे. सध्याच्या ढगांची स्थिती पाहाता. ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असल्याचे आयएमडीच्या संचालक शुभांगी भुते यांनी बोलताना सांगितले.

### दोन दिवस रेड अलर्ट



राज्यात पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई आणि मुंबई महानगर या भागात अतिवृष्टी झालेली आहे. दौंडमध्ये ११७ मि.मी., बारामतीत १०४.७५ मि.मी., इंदापुरात ६३.२५ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. बारामतीत २५ घरांची अंशत: पडझड झाली असून, पुरात अडकलेल्या ७ जणांना वाचविण्यात यश आले आहे. ७० ते ८० कुटुंबांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. मोबाईल सेवा विस्कळित झाल्या होत्या. त्या आता पूर्ववत होत आहेत. इंदापूर येथे दोन जणांना पूरस्थितीतून बाहेर काढण्यात आले आहे. फलटणमध्ये १६३.५ मि.मी. इतका पाऊस झाला आहे. एनडीआरएफचा एक चमू फलटणमध्ये आहे. ३० नागरिक दुधेबावी गावाशेजारी अडकले होते. त्यांना निवास आणि भोजनाची सुविधा पुरविण्यात आली आहे. सोलापूरमध्ये ६७.७५ मि.मी. पाऊस झाला. माळशिरस तालुक्यात सहा नागरिक पुरात अडकले होते, त्यांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. रायगडमध्ये एका व्यक्तीचा वीज पडून मृत्यू झाला आहे तर महाड ते रायगड किल्ला रस्ता अतिवृष्टीमुळे बंद करण्यात आला आहे.

### आपत्ती व्यवस्थापन केंद्र २४ तास सुरु-एकनाथ शिंदे



राज्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असून विशेषतः मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रात पुढील काही तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, नाशिक जिल्हाधिकारी त्याचप्रमाणे ठाणे, मुंबई महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करून मदत कार्याबाबत विविध सूचना दिल्या. या सर्व जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन केंद्रे २४ तास सुरु राहतील हे पहावे. तसेच अधिकाऱ्यांनी अतिशय काळजीपूर्वक आणि दक्ष राहून काम करावे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊ नये आणि कोणतीही जीवित किंवा वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळेवर आणि प्रभावी पावले उचलावी, असे शिंदे यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांनी घेतला राज्यातील आढावा



राज्यात सुरू झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना मदत करण्यासाठी प्रशासनाला सतर्क आणि सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. पावसामुळे ज्या ठिकाणी नुकसान झाले आहे, तेथे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेशही त्याची दिले आहेत. याशिवाय राज्याच्या मुख्य सचिव आणि राज्याच्या आपत्ती निवारण कक्षाशी ते सातत्याने संपर्कात आहेत. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा हे रविवारपासून नागपूर, नांदेड आणि मुंबईच्या दौऱ्यावर आहेत.मुख्यमंत्री फडणवीस हे शहा यांच्यासोबत आहेत. तरीही ते राज्यात पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. त्याचप्रमाणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनादेखील सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

### परिस्थिती हाताळण्यास यंत्रणा सज्ज-गिरीश महाजन



राज्यात मुसळधार पावसामुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सोमवारी आढावा घेतला. राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात महाजन यांनी तातडीने भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. राज्यात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेली आपत्कालीन परिस्थिती सक्षमपणे हाताळण्यासाठी यंत्रणा २४ तास सज्ज असल्याचे महाजन यांनी यावेळी सांगितले.

### अजित पवारांकडून पाहणी



राज्याच्या अनेक जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी पहाटेपासूनच बारामती, इंदापूर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील गावांना भेट देऊन दिवसभर परिस्थितीची पाहणी केली. पाऊस, धरणांची स्थिती, स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला.

## ...तर यापेक्षा मोठा हल्ला करु!

### विदेश मंत्री एस.जयशंकर यांचा सज्जड दम



**नवी दिल्ली ।** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव आणखी वाढला. या दरम्यान, १० मे रोजी दोन्ही देशांनी युद्धविराम घोषित केला. पण, याबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या विधानावरुन राजकारण तापले आहे. विरोधी पक्ष अजूनही केंद्र सरकारवर अमेरिकेच्या दबावाखाली युद्धविराम जाहीर केल्याचा आरोप करत आहे. सरकारने वारंवार विरोधकांच्या आरोपांचे खंडन केले आहे. आता पुन्हा एकदा परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या दाव्यांचे खंडन केले अन् पाकिस्तानला कडक शब्दात इशाराही दिला. परराष्ट्र व्यवहार सल्लागार समितीच्या बैठकीत एस. जयशंकर यांनी सहभाग घेतला.

यावेळी त्यांनी परकीय हस्तक्षेपावर भाष्य केले. ते म्हणाले की, जेव्हा पान २ वर

## लपून नव्हे, पाकिस्तानवर सांगून हल्ला!

### गुजरातमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गर्जना



**अहमदाबाद ।** आम्ही लपून नाही तर सांगून पाकिस्तानवर हल्ला केला, भारतीय बहिणींचे सिंदूर पुसून टाकण्याचा कोणताही प्रयत्न झाला तर निश्चितच बदला घेतला जाईल, भारत पर्यटनावर विश्वास ठेवतो, पर्यटन लोकांना जोडते. पण पाकिस्तानसारखा एक देश असाही आहे जो दहशतवादाला पर्यटन मानतो आणि हा जगासाठी एक मोठा धोका आहे. अशी गर्जना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरात दौऱ्यावर आहेत. त्यांनी एका पान २ वर



**वडोदरा ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरात दौऱ्यावर असताना रोड-शोदरम्यान उपस्थित असलेले कर्नल सोफिया कुरेशी यांचा परिवार

पाकिस्तानातील नागरिकांनो आणि विशेषतः तिथल्या मुलांनी मोदी काय म्हणतात ते काळजीपूर्वक ऐका, तुमचे सरकार आणि तुमचे सैन्य दहशतवादाला पाठिंबा देत आहे. सरकार आणि लष्करासाठी दहशतवाद हा पैसा कमावण्याचे साधन बनला आहे. पाकिस्तानच्या तरुणांना निर्णय घ्यावा लागेल, मुलांना ठरवावे लागेल. हा मार्ग त्यांच्यासाठी योग्य आहे का, तो त्यांचे काही भले करत आहे का?

### जो कुंकू पुसेल, त्याचा खात्मा

मोदीशी पंगा घेणे एवढे महागात पडू शकते, असा विचार कधी स्वप्नातही दहशत पसरवणाऱ्यांनी केला नसेल. त्यांनी २२ तारखेला जो खेळ खेळला होता, तो आम्ही हाणून पाडला. आमच्या सैन्याने पाकिस्तानी सैन्याला पार धूळ चारली. आम्ही देशाच्या सैन्याच्या शौर्याला सॅल्यूट करतो. जो कुंकू पुसेल, त्याचा खात्मा निश्चित आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी जे काही केले, भारत गप्प बसू शकेल का? मोदी गप्प बसू शकेल का? विचार करा. जर कोणी आपल्या माता-भगिनींचे कुंकू पुसण्याचा प्रयत्न केला, तर त्याचा खात्मा निश्चित आहे. म्हणूनच, ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नाही. तर ती आपल्या भारतीय मूल्यांची आणि आपल्या भावनांची अभिव्यक्ती आहे. दहशतवाद्यांनी १४० कोटी भारतीयांना आव्हान दिले होते. म्हणूनच मोदीने तेच केले, ज्यासाठी देशवासीयांनी त्याला प्रधानसेवकाची जबाबदारी दिली.

## वर्षभरात देश नक्षलमुक्त करणार!

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची ग्वाही



**नांदेड ।** ऑपरेशन सिंदूर कारवाईतून भारताने आपली क्षमता आणि ताकद जगासमोर सिद्ध केली असून भारताकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांची गय केली जाणार नाही असा स्पष्ट इशारा मोदी सरकारने केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर जगाला दिला आहे. आता देशातील नक्षलवाद्यांचे अड्डेही उद्ध्वस्त करण्यात येत असून वर्षभरात या देशाच्या भूमिवरून नक्षलवादाचा नायनाट झालेला असेल, या संकल्पाचा पुनरुच्चार आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी नांदेड येथील प्रचंड शंखनाद सभेत बोलताना केला.

गेल्या २२ एप्रिलला पहलगाममध्ये पाक प्रशिक्षित अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप पर्यटकांची भ्याड हत्या केली, तेव्हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धूळ चारण्याचा इशारा दिला होता. १० वर्षांपूर्वीची काँग्रेसची पान २ वर

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | 2550 |
| नवती (२) | 2350 |

## मिश्कीली




## कार अपघातात माजी आमदार ठार



**लातूर ।** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील बेलकुंड उड्डाणपूलावरून जात असताना गाडी स्लिप होऊन सुरक्षा कठडा तोडून चारवेळेस पलटी झाल्याने भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात माजी आमदार आर.टी. देशमुख यांचे निधन झाले आहे, अपघातानंतर त्यांना पुढील उपचारासाठी लातूर येथे पाठवण्यात आले होते. लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. खासदार बजरंग सोनवणे यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. बीड जिल्ह्यातील माजलगावचे माजी आमदार आर टी देशमुख यांच्या गाडीला लातूर तुळजापूर रस्त्यावरील बेलकुंड येथे अपघात झाला आहे. या अपघातात माजी आमदार आर.टी.देशमुख हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना तात्काळ लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले, पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच मंत्री पंकजा मुंडे तत्काळ आपले कार्यक्रम रद्द करुन लातूरला रवाना झाल्या आहेत.

## ग्रंथालयांसाठी ऑनलाईन प्रणाली!



**मुंबई ।** ग्रंथालय प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. पात्र ग्रंथालयांच्या वर्गबदल प्रक्रियेसाठी ऑनलाइन प्रणाली विकसित करावी असे, निर्देश उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिले. चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात ग्रंथालय संचालनालयाच्यावतीने सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी बोलताना पाटील म्हणाले, ग्रंथालय श्रेणीकरणाचे निकष स्पष्ट करताना ड वर्गातून क वर्गात रूपांतरासाठी किमान १ हजार १ ग्रंथ संख्या , तर कफ वर्गातून ब वर्गात जाण्यासाठी किमान ५ हजार १ ग्रंथ संख्या आणि ब वर्गातून अ वर्गात रुपांतरासाठी १५ हजार १ ग्रंथ संख्या आवश्यक आहे. बैठकीत राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या प्रस्तावित इमारतीसह अधिनस्त कार्यालयांच्या प्रलंबित बाबींवरही चर्चा झाली. ग्रंथालयांचे आधुनिकीकरण आणि सुलभता यावर भर द्यावा. असेही ते यावेळी म्हणाले.